आपल्या परिसरातील ताज्या घडामोडींसाठी
Deshdoot Media Group
आजच डाऊनलोड करा, देशदूतचे मोबाईल ॲप!
ॲप डाऊनलोड करण्यासाठी
क्यूआर कोड स्कॅन करा!

शिल्पकार विकासाचा...

# देशदूत



शेवटचे पान
संत तुकोबांच्या पालखीचे उद्योगनगरीत स्वागत



धनंजय मुंडे यांना झटका
कोल्हापूरात भानामती!

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५६ । अंक २८३ । शुक्रवार, दि. २० जून २०२५ । पाने १२+८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

## संपादकीय

### केशराच्या पावसाचा चकवा

मारुती चितमपल्ली नावाच्या केशराच्या पावसाने ऐन मान्सूनच्या काळात रसिकांना चकवा दिला आणि तो अरण्याच्या गूढ वाटेवर कायमचा निघून गेला. अरण्यऋषीची अरण्यालाच कायमची भूल पडली. जंगलांनी मारुती चितमपल्ली यांचे जीवन समृद्ध केले आणि त्यांच्या पुस्तकांनी जंगलवेड्यांचे. ते आणि निसर्ग या जणू एकाच नाण्याच्या दोन बाजू झाल्या होत्या. 'घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावेत' ही विं.दा. करंदीकर यांची भावना ते शब्दश: जगले. निसर्गाकडून त्यांना जे मिळाले त्याची त्यांनी मनसोक्त उधळण केली. जंगलवेडी माणसे घडवून, जंगलाप्रतीच्या लोकांच्या जाणिवा समृद्ध करून त्यांनी निसर्गाचे देणे त्याला परत केले. त्यांनी लोकांना जंगल वाचायला शिकवले. निसर्गलेखनाचे दालन साहित्यिकांसाठी खुले केले. अत्यंत सोप्या आणि ओघवत्या भाषेत सव्वीस पुस्तके लिहिली. पक्षिकोशाची निर्मिती केली. वृक्षकोश आणि मत्स्यकोशाचे स्वप्न पाहिले होते. एक लाख नवीन शब्द मराठी भाषेला दिले. ते शब्द कोणत्याही पुस्तकाऐवजी विदर्भाच्या जंगलातील आदिवासींच्या बोलीत सापडतील असे ते म्हणत. 'चकवाचांदण' हे त्यांचे आत्मकथन. ते घुबडाचे नामाभिधान आहे असे ते सांगत. या शब्दाने घुबडाकडे बघण्याची दृष्टीच बदलून टाकली. केशराचा पाऊस कसा पडतो याचे कोडे त्यांनीच एकदा उलगडले होते. डिसेंबर महिन्यात मेळघाटातील झाडांना फुले येतात. फुलांचे केशर हवेत उडते. पहाटेच्या दवाबरोबर ते अंगावर पडते असा स्वानुभव त्यांनी कथन केला होता. जंगलाच्या अभ्यासाचा ध्यास त्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत जपला. एक नोंदवही ते सतत जवळ बाळगत. नोंदी करून त्याची खात्रीही करून घेत. संपादन करून त्यांच्या नुसत्या नोंदवह्या जरी प्रकाशित केल्या तरी निसर्गातील अद्भूत साहित्याची मेजवानी रसिकांना मिळेल असे ज्येष्ठ साहित्यिक व्यंकटेश माडगूळकर म्हणत. ते दोघे खास दोस्त होते. 'विद्या विनयेन शोभते' याचे मूर्तिमंत उदाहरण होते. प्रतिभावंत लेखक, पक्षिशास्त्रज्ञ, वन्यजीव अभ्यासक, व्यासंगी संशोधक अशी त्यांची समाजात ओळख होती. 'पद्मश्री' या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासह अनेक पुरस्कारांनी ते सन्मानित होते. त्यांचा अनेक भाषांचा अभ्यास होता. साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले. पण त्याचा अहंकार त्यांना नव्हता. प्रसिद्धीची हौस नव्हती. व्याख्यान, लोकसंवाद, मुलाखती सुरु असायच्या. पण त्यामुळे वाचन, संशोधन आणि लेखनाला पुरेसा वेळ मिळत नाही असे तर म्हणत. जो भेटेल त्याला ते आपलेच वाटत. प्रामाणिकपणे सरकारी नोकरी करता येते. ती करता करता संवेदनशीलता जपता येते. प्रामाणिकपणे नोकरीला जगण्याचे साधन बनवले तर जगणे गाणे होते याचा वस्तुपाठ म्हणजे मारुती चितमपल्ली. त्यांच्या जाण्याने जंगल खऱ्या अर्थाने पोरके झाले आहे.

# रिंगरोडसाठी साडेपाच हजार कोटी

## भूसंपादनाला गती मिळणार; महाजनांकडून आढावा

- गोदावरी बारमाही वाहती ठेवणार
- भूसंपादनासाठी शेतकऱ्यांशी चर्चा करणार

नाशिक । प्रतिनिधी

सिंहस्थाच्या निमित्ताने साडेपाच हजार कोटी रुपयांच्या भूसंपादनातून आकारात येणाऱ्या नाशिक शहराभोवतीच्या बहुउद्देशीय रिंगरोडच्या कामाला गती देण्यात आली असून, या माध्यमातून नाशिकच्या विकासाला वरदान ठरणारा मार्ग अस्तित्वात येणार असल्याचे राज्याचे जलसंपदामंत्री व सिंहस्थ कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले.

महाजन यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात अधिकाऱ्यांची बैठक घेऊन सिंहस्थ विकासकामांचा आढावा घेतला. त्यानंतर पत्रकार परिषदेत बोलतांना महाजन म्हणाले, वेळ कमी आणि कामे जास्त आहेत, त्यामुळे कामांना गती देण्याची गरज आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने २२०० कोटी रुपयांच्या विविध विकास कामांच्या वर्क ऑर्डर गतिमान झाल्या असून, घाट, ड्रेनेज व विविध विकास कामांची स्थिती प्रगतिपथावर आहे.

### २२ ला नागपूरला बैठक

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीमध्ये २२ तारखेला नागपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आला आहे. या बैठकीमध्ये सर्वच सचिव दर्जाचे अधिकारी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी राहणार आहेत. या बैठकीत रिंग रोड, द्वारका येथील वाहतूक कोंडीवरील उपाययोजना, महामेट्रोवरही चर्चा करण्यात येणार आहे.




साधूग्रामसाठी नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे भूसंपादनाबाबत चर्चा सुरू असून सचिव पातळीवर बैठका झालेल्या आहेत. लवकरात लवकर तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरु असून, येत्या दहा ते पंधरा दिवसात मुंबईला निवडक शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेऊन हा प्रश्न सोडविला जाणार आहे. जागेचा मोबदला टीडीआर स्वरुपात द्यायचा की, कसा द्यायचा यावर निर्णय घेतला जाणार आहे. यासाठी अंदाजे २२०० ते २४०० कोटी रुपये खर्च येण्याची शक्यता आहे, असेही महाजन यांनी सांगितले.

जगभरातून भाविक गोदावरी नदीच्या पवित्र स्नानासाठी येतात. मात्र, नदी प्रवाहित नसल्याने भाविकांचा हिरमोड होऊ नये यासाठी गोदावरी प्रवाहित ठेवण्याचा प्रयत्न राहील. त्र्यंबकेश्वरपासून गोदावरी नदीमध्ये पाणी सतत वाहते ठेवण्याच्या दृष्टीने नियोजन केले जात असून, त्यासाठी त्र्यंबकेश्वरला मुकणे व काचुर्ली धरणातून पाणी उचलून अहिल्या धरणात सोडले जाणार आहे. त्या ठिकाणी नदीपात्रात पाणी वाहते ठेवण्याची प्रक्रिया राबवली जाणार आहे. यासाठी सुमारे ३०० कोटी रुपयांची पायाभूत

पान १० वर >>>

# देशाला गृहमंत्र्यांची गरज, घरफोड्या शहांची नाही

## उद्धव ठाकरे यांचा हल्लाबोल

मुंबई । वृत्तसंस्था

यांचे केंद्रात सरकार आल्यानंतर पनवती लागलेली आहे. सगळ्या कामांची वाट लागलेली आहे. एअरपोर्टचे छत गळत आहे. मेट्रोच्या स्टेशनमध्ये पाणी जात आहे. प्रयागराजला माणसे चेंगरून गेली. कुणीही जबाबदारी घ्यायला तयार नाही. दिल्लीच्या रेल्वेस्टेशनवर माणसे चेंगरून गेली, त्याचीही जबाबदारी कुणी घेत नाही. विमान अपघातात माणसे गेली, कोणी जबाबदारी घ्यायला तयार नाही. म्हणजे काय याचा गांभीर्याने विचार केला तर, आज आपल्या देशाला पंतप्रधानाची गरज आहे. हे पंतप्रधान देशाचे नाहीत, भाजपचे पंतप्रधान

पान १० वर >>>






## शिंदेंचे ठाकरेंवर शब्दबाण

मुंबई । वृत्तसंस्था

शिवसेना वर्धापन दिनाच्या मेळाव्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना उद्धव ठाकरे गटावर जोरदार हल्लाबोल केला आहे. आमचा मेळावा बाळासाहेबांच्या विचारांचा आहे, तर दुसरा मेळावा सत्तेसाठी लाचार झालेल्यांचा आहे, असे म्हणत शिंदे यांनी ठाकरे गटावर निशाणा साधला. हिंदुत्वाचा भगवा, शिवधनुष्य आणि जनतेचा आशीर्वाद आपल्याकडेच असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

यावेळी बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले की, आपल्या पक्षात जी वाढ होत आहे, ती सर्वांच्या मेहनतीचे फळ आहे.

पान १० वर >>>

# थेट बोगस 'जीआर' बनविला

## जि.प. कार्यकारी अभियंत्याचा प्रताप; एक कोटी लाटण्याचा प्रयत्न

नाशिक । प्रतिनिधी

पायाभूत सुविधा देण्याच्या कामासाठी बोगस निविदा प्रक्रिया राबवून नाशिक जिल्हा परिषदेतील 'इवद' (इमारत व दळणवळण) विभागाच्या तत्कालीन कार्यकारी अभियंता शैलजा नलावडे यांनी एक कोटी रुपयांच्या शासन निधीचा बोगस जीआर तयार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

स्वत:सह निविदाधारकांचा आर्थिक फायदा होईल, यासाठी नलावडे यांनी काही निविदाधारकांसह इतरांशी संगनमत करुन हा बोगस आदेश बनविल्याचे प्रशासकीय पडताळणीसह चौकशीत समोर आल्याने त्यांच्यावर भद्रकाली पोलीस ठाण्यात जि. प.चे कनिष्ठ प्रशासन अधिकारी प्रदीप रतन आहिरे यांनी फिर्याद नोंदविली आहे.

संशयित शैलजा या प्रशाकीय सेवेतील अधिकारी असून त्या काही महिन्यांपूर्वीच

पान १० वर >>>

### प्रतिनियुक्तीवर असताना गैरप्रकार

नलावडे या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा उत्तीर्ण झाल्या आहेत. काही दिवसांपूर्वीच त्या प्रतिनियुक्तीवर जिल्हा परिषदेतील इवद क्रमांक तीनमध्ये रुजू झाल्या होत्या. त्यानंतर त्यांनी गैरकारभार केल्याचे आरोप-प्रत्यारोप झाले. यानंतर चौकशी झाली. त्यातच त्यांची बदली देखील करण्यात आली. यासंदर्भात शैलजा यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात (मॅट) धाव घेऊन बदलीला आव्हान दिले. मात्र, निकाल त्यांच्याविरोधात लागल्याचे समजते. त्या सध्या कुठे आहेत, याचा तपास आता भद्रकाली पोलीस करणार आहेत.

GOLDEN SATURDAY LOTTO INDIA
Government of Mizoram
आजपासून बना करोडपती!!
सोडत उद्या सायंकाळी
जिंका ₹ 1.29 करोड+
तिकीट ₹ 30/-
ड्रॉ दर शनिवारी, रात्री 9:30 वाजता
SHREE GURUDATT LOTTERY CENTER - MALEGAON DIST : NASHIK Mobile: 97667 21645
LAKSHMI ONLINE - NASHIK, KARANJA, NASHIK Mobile: 94222 57161
TIRUPATI LOTTERY CENTER - NANDURBAR Mobile: 83298 85302
GURU KRUPA CYBER CAFE - SHAHADA, DIST : NANDURBAR Mobile: 98908 98990
ARU ONLINE LOTTERY - NASHIK Mobile: 99218 40503
SAMARTH ONLINE - DHULE Mobile: 93728 10070
रिटेलरशिपसाठी आमच्याशी संपर्क साधा:
गोल्डन लॉटो मुंबई 83693 33517




# भूसंपादनासाठी ५३ हजार ३५४ कोटींची तरतूद करा : मुख्यमंत्री

मुंबई । प्रतिनिधी

प्रस्तावित नागपूर-गोवा शक्तिपीठ महामार्गाला कोल्हापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा विरोध असतानाही राज्य सरकारने हा प्रकल्प आता रेटून नेण्याचे ठरवले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी घेतलेल्या बैठकीत शक्तिमार्गासह राज्यातील ११ महत्वाकांक्षी प्रकल्पांच्या भूसंपादनासाठी लागणाऱ्या ५३ हजार ३५४ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्याची सूचना बैठकीत केली. राज्यातील महत्त्वाच्या सर्व प्रकल्पांचे भूसंपादन ठरलेल्या वेळापत्रकानुसार पूर्ण करून प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लावावेत. तसेच, भूसंपादनाअभावी एकही प्रकल्प रखडणार नाही याची संबंधित सर्व यंत्रणांनी दक्षता घ्यावी, अशा सूचना फडणवीस यांनी यावेळी दिल्या.

फडणवीस यांनी आज आपल्या वर्षा या शासकीय निवासस्थानी महत्त्वाच्या रस्ते प्रकल्पांच्या भूसंपादनाचा आढावा घेतला. यावेळी नागपूर - गोवा शक्तिपीठ महामार्ग, विरार - अलिबाग कॉरिडोर, जालना - नांदेड द्रुतगती महामार्ग, पुणे रिंग रोड पूर्व, पश्चिम आणि विस्तारीकरण, भंडारा - गडचिरोली द्रुतगती महामार्ग, नागपूर - चंद्रपूर द्रुतगती महामार्ग, नागपूर - गोंदिया द्रुतगती महामार्ग, नवेगाव (मोर) - सुरजागड मिनरल कॅरिडोर, वाढवण - इगतपुरी द्रुतगती महामार्ग या राज्यातील रस्ते प्रकल्पांच्या भूसंपादनाचा तसेच वर्धा - नांदेड, वर्धा - गडचिरोली रेल्वे प्रकल्प आणि कोल्हापूर, कराड, अकोला, गडचिरोली आणि छत्रपती संभाजीनगर येथील विमानतळाच्या भूसंपादनाच्या सद्यस्थितीची माहिती फडणवीस यांनी घेतली.

नाशिकमध्ये 3 कारखाने असलेल्या जागतिक दर्जाच्या उत्पादन कंपनीसाठी पाहिजेत
दीर्घकालीन, स्थिर आणि वाढीसाठी संधी
1. I.T.I. / (Fitter, Machinsist, T & D) / D.M.E. — M
फ्रेशर / २ वर्षापर्यंत. अनुभव सीएनसी मशीन प्रशिक्षण दिले जाईल.
2. Customer Co-ordinator — M/F
● पदवीधर / समान किमान ● किमान ४ वर्षे अनुभव पाहिजे
● एमएस-ऑफिस, ● इंग्रजी आणि ई-मेलचे चांगले कौशल्य.
3. QA इन्स्पेक्टर — M
● १२ वी / आयटीआय डीएमई फ्रेशर / २ वर्षाचा अनुभव ● मोजमाप यंत्रांचे ज्ञान आवश्यक
ASHGRAPH TECHNOLOGIES PVT. LTD.
मुलाखतीसाठी तुमचा रिज्युम ७२७६५ ६६६१३ या क्रमांकावर व्हॉट्सॲप करा किंवा hr@primegraphite.com वर ईमेल करा.
पीएफ आणि इतर फायद्यांसह उत्तम प्रगतीची संधी.




### अभिनेते विवेक लागू कालवश

**मुंबई** । ज्येष्ठ अभिनेते विवेक लागू यांचे काल निधन झाले. लेखक, संगीत दिग्दर्शक अशीही त्यांची ओळख होती. अनेक वर्षांपासून ते इंडस्ट्रीत काम करत होते. आज २० जून रोजी सकाळी दहा वाजता ओशिवरा स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होणार आहेत. टेलिव्हिजनवर सर्वाधिक काळ चाललेली आणि गाजलेली मालिका 'चार दिवस सासूचे' मध्ये त्यांनी काम केले. त्यांनी शेक्सपियरची दोन नाटकेही केली. 'अगली', 'व्हॉट अबाऊट सावरकर', 'सर्व मंगल सावधान' या सिनेमामध्ये त्यांनी भूमिका केली होती.

जाहीर सूचना

Sahyadri HOSPITALS

सदर जाहीर सूचनेद्वारे तमाम लोकांना कळविण्यात येते की, खालील नमूद रुग्णालयात नमूद कालावधीत आपात्कालीन रूग्ण विभाग व अंर्तरुग्ण विभागात दाखल असलेल्या रुग्णांवर केलेल्या वैद्यकीय उपचाराबाबतचे केसपेपर्स, तपासणी अहवाल, लॅब रिपोर्ट, एक्स रे रिपोर्ट, एक्स रे फिल्म्स, इतर अनुषंगिक कागदपत्रे व संगणकीय माहिती जतन करण्याचा कायदेशीर कालावधी उलटून गेल्याने सदर कागदपत्रे / माहिती रुग्णालय व्यवस्थापनाने अर्ज नष्ट करण्याचे ठरवले आहे. या संदर्भात रुग्णालयात दाखल असलेले अथवा उपचार घेतलेले रुग्ण अथवा रुग्णाच्या प्रथम वारसांची कोणतीही हरकत असल्यास तशा आशयाचा रुग्णाचे नाव, नोंदणी क्रमांक,दाखल/उपचाराचा/तपासणी व पत्याच्या समावेश असलेली लेखी सूचना घेऊन सदर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत ०५ जुलै २०२५ पूर्वी रुग्णालयाच्या वैद्यकीय कागदपत्र विभागाशी प्रत्यक्ष संपर्क साधावा. सदर वैद्यकीय रेकॉर्ड नष्ट करण्याची प्रक्रिया ०५ जुलै २०२५ पासून सुरू होईल.

अशी कोणतीही हरकत विहीत कालावधीत व विहीत स्वरूपात दाखल न झाल्यास सदर कागदपत्रे नष्ट करण्यासंदर्भात कोणाचीही हरकत नाही, असे गृहीत धरून सदर कागदपत्रे नष्ट करण्यात येतील. विहीत कालावधीनंतर आलेला कोणताही अर्ज वैध धरला जाणार नाही. तसेच सदर कागदपत्रे नष्ट केल्यानंतर होणाऱ्या नुकसानीस अथवा त्यातील माहितीस रुग्णालय व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

| रुग्णालयाचे नाव | कालावधी |
| --- | --- |
| सह्याद्री सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, मुंबई-आग्रा रोड, द्वारका सर्कलजवळ, वडाळा रोड, नाशिक | आपात्कालीन विभागासंबंधित कागदपत्रे - १ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०१८ |
| | अंर्तरूग्ण विभागासंबंधित कागदपत्रे १ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०१८ |

कंपनीचे नाव : सह्याद्री हॉस्पिटल्स प्रा. लि.
कार्पोरेट आयडेन्टीफिकेशन नंबर(सिआयएन) : सिआयएन:यु८५११०पिएन१९९६पिटिसि०९९४९९
रजिस्टर्ड ऑफिसचा पत्ता : प्लाट नं. ५४, सर्व्हे नं. ८९ व ९०, लोकमान्य कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११०३८
टेलीफोन नं. : ०२५३ - ६६९१६७८, (०२०) ६७२१५०००
ई-मेल आयडी : Customercare.nsk@sahyadrihospitals.com
वेब साईट : www.sahyadrihospital.com

नवी आशा नवी दिशा
सार्वमत
पाहिजेत
उत्तर महाराष्ट्रात अग्रेसर असणाऱ्या **दैनिक सार्वमत**च्या अहिल्यानगर प्रॉडक्शन विभागात खालील जागा त्वरित भरणे आहे.
प्रॉडक्शन सुपरवायझर — पद १
(किमान ५ वर्षांचा अनुभव)
वर्तमानपत्र छपाई कामाचा वेब ऑफसेटचा वरिष्ठ पातळीवरील अनुभव आवश्यक. बहुरंग छपाई मशीन मेंटेनन्सच्या कामाची माहिती असावी. प्रिंटिंग टेक्नॉलॉजीचा डिप्लोमा असल्यास प्राधान्य.
आकर्षक पगार/अनुषंगिक सुविधा दिल्या जातील.
इच्छुकांनी स्वहस्ताक्षरातील अर्ज, शैक्षणिक पात्रता, अनुभव, इतर सविस्तर माहिती व एक पासपोर्ट आकारातील फोटोसह खालील पत्त्यावर **दि. २५ जून२०२५पर्यंत** पाठवावेत.
- कार्मिक विभाग -
**श्रीरंग प्रकाशन प्रा. लि.**
प्लॉट नं. एन-११, रेणुका माता मंदिराशेजारी, निंबळक रोड, एमआयडीसी, अहिल्यानगर. फोन - ०२४१-२४३११०३/०४
ई-मेल : bmngr@deshdoot.com

नाशिक ■ नाशिक ■ जळगाव ■ धुळे ■ नंदुरबार ■ अहमदनगर येथून एकाच वेळी स्वतंत्रपणे प्रकाशित



cmyk